# राशिभविष्य - ऑगस्ट, २०२१.

**दादा दामले ( dadadamle@gmail.com)**

**=========================================**

**सूचना- प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षरांसाठी असलेल्या प्रत्येक जन्मनक्षत्राचा तारक मंत्र दिला आहे. आपल्या राशीच्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून उपयोग करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास आम्हांस कळवावे.**

**==========================================**

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत हर्षल असून त्याच्यामुळे या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या अतिशय अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असणे संभवते. त्यामुळे कसल्याही प्रकारचे बंधन, धाक, दडपण असह्य होत असले पाहिजे. या राशीची लहान मुले तर सध्या अतिशय हूड, खोडकर, खट्याळ स्वभावाची झाली असण्याची शक्यता वाटते. असे असले तरी हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व उपयुक्त होईल. या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे होणे संभवते. शिवाय आर्थिक समस्याही त्रस्त करतील. या राशीच्या चतुर्थ स्थानी कर्क राशीत रवि व बुध असे दोन ग्रह असून येथील बुध चतुर्थ, पंचम स्थानी असेपर्यंत प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे धननाश होणे, गृहसौख्यात बाधा येणे संभवते. शिवाय संततीपासून त्रास, मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. पण या बुधामुळे महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. रवि ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, कार्यदिरंगाई होणे, कौटुंबिक त्रास सहन करावा लागणे, नको इतका खर्च करावा लागणे, मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करणे, प्रिय जनांपासून दूरत्व येणे, नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागणे अशापैकी मानसिक अस्वस्थता येणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या पंचम स्थानी मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळ

संततिसुखाचे दृष्टीने प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे संततीपैकी कोणाच्या मनाविरुद्ध आचरणाची समस्या तर कोणाच्या अनारोग्याची समस्या
मनस्ताप देईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. काही मंडळींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. शुक्रामुळे सर्व प्रकारचे कलात्मक छंद जोपासत असणारांना व कलाकारांना आपल्या कलेत प्रगती करणे शक्य होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा शुक्र या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अंगी उत्तम कला असूनही त्यात प्रगती करणे किंवा प्रसिद्धी मिळविणे अशक्य होईल. या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे काहीही कारणाने कुटुंबात गैरसमज, वाद, भांडणे होतील. तसेच वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होईल. त्याशिवाय अपघात होणे, रक्तविकार, त्वचारोग, मुखदंत रोग अशापैकी अनारोग्य होण्याची शक्यताही दिसते. जपा. या राशीच्या दशम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो साधारणपणे शुभ होईल व कोळसा, लोखंड यांचा व्यापार असणारांना अनुकुल होईल. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरु ग्रह अनुकुल तर नेपच्यून प्रतिकुल होईल. गुरु ग्रहामुळे इच्छाआकांक्षा पूर्ण होतील, अनेक मार्गांनी धनलाभ होईल, काही मंडळींना वाहनसुख मिळेल तर या राशीच्या काही विवाहेच्छू मंडळींना विवाहयोग येईल. पण नेपच्यूनमुळे आर्थिक नुकसान होणे, अर्थप्राप्तीस विलंब होणे, घोटाळे होणे, कुमार्गी मित्रापासून त्रास होणे व त्यामुळे नैराश्य येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर “श्रीगणेश उपासना” व “श्रीहनुमान उपासना “ अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे पठण करा. रात्री झोपी जाणापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी “ओम अश्विनीकुमाराभ्याम नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी “ओम यमाय नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत राहू असून त्याच्यामुळे सतत अपमान होणे संभवते. त्यामुळे मनात डूख धराल. काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या तृतीय स्थानी कर्क राशीत रवि व बुध असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात

हे दोन्ही ग्रह या राशीच्या चतुर्थ स्थानी सिंह राशीत जात आहेत. या राशीच्या चतुर्थ स्थानी मंगळ व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, सर्व प्रकारे सुखसमाधान लाभेल, नोकरीत वरिष्ठ तुमच्या कर्तृत्वावर प्रसन्न होतील, त्याशिवाय काही मंडळींचा मानसन्मान होणे व क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या चतुर्थ स्थानी सिंह या स्वराशीत गेल्यावर तो प्रतिकुल होईल व त्यामुळे कौटुंबिक जीवनात असमाधानकारक घटना घडतील, नियोजित कार्यात दिरंगाई होईल, अनावश्यक खर्च झाल्यास निराशा येईल व त्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. बुध ग्रह साधारणपणे संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्याच्यामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे संभवते. तसेच धननाश होणेही शक्य आहे. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे काही प्रमाणात गृहसौख्य व मित्रसुख मिळेल. या चतुर्थ स्थानी सिंह राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. पण मंगळ ग्रह प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात

विविध कारणांनी बाधा येईल. शुक्रामुळे ज्यांच्याजवळ शेतीवाडी आहे अशांना त्यापासून लाभ होईल. पण येथील शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर या राशीच्या सर्व कलाकार मंडळींना आपापल्या कलेत प्रगती करणे शक्य होईल. पण बुधामुळे संततीविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे तीव्र अशुभ असे काही घडणार नाही. पण काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरु बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच येथील नेपच्यून गुप्त पोलीसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल. या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे शत्रुत्व निर्माण होणे, सांपत्तिक अडचणी निर्माण होणे, जिवावरचे प्रसंग येणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना

मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी "ओम ब्रह्माय नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी " ओम सोमसोमाय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या धनस्थानी कर्क राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी सिंह राशीत जात आहेत. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात हे दोन्ही ग्रह प्रतिकुल होणार असून रविमुळे वाढता खर्च, अन्य आर्थिक समस्या, वित्तहानी, अशापैकी घटना आर्थिक चिंता निर्माण करतील व त्यामुळे अस्वस्थ व्हाल. जपा. त्याशिवाय घरात वाद, भांडणे होणे संभवते. काही मंडळींना नेत्रविकार त्रस्त करतील. बुधामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होईल, छुप्या शत्रूंचा त्रास सहन करावा लागेल. पण हा बुध महिन्याच्या पूर्वार्धात धनदायक होणेही संभवते. रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे परिस्थितीत सुधारणा होईल. आरोग्य सुधारेल, नोकरीत वरिष्ठ तुमच्या कामावर प्रसन्न होतील, काही मंडळींचा सन्मान होईल तर क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मंगळ व शुक्र हे दोन ग्रह प्रथमपासून आहेतच. येथील मंगळ ग्रह शुभ व अनुकुल असून त्याच्यामुळे हिम्मत वाढेल, महत्त्वाकांक्षा वाढेल व हातून एखादे कर्तृत्व घडेल. पण या मंगळामुळे इजा, दुखापत होणेही संभवते. जपा. शुक्रामुळे काही मंडळींना नवी नोकरी मिळेल तर काही मंडळींना आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. काही मंडळींना भूमिलाभ होईल. या स्थानी असलेला शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत जात आहे. त्या काळात ज्यांची शेतीवाडी आहे अशा मंडळींना त्यापासून
लाभ होईल, ऐषाराम मिळेल, व गृहसौख्य लाभेल. या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत केतू असून तो अनुकुल होईल, व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, सर्वांचे सहकार्य लाभेल, तर काही मंडळींना कीर्ती-प्रसिद्धी मिळणेही शक्य आहे. या राशीच्या अष्टम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे मानसिक अस्वास्थ्य निर्माण होणाऱ्या घटना घडतील, क्वचित कोणास एखादा मोठा आजार होणे ही संभवते. काळजी घ्या. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह अध्यात्माची मनापासून ओढ असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे व मनशांती मिळविणे शक्य होईल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर

काहींना परदेशगमनाचे योग येतील. सूचक स्वप्ने पडतील. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे निश्चित काय घडू शकेल, हे सांगणे कठीण आहे. पण त्याच्यामुळे मित्रांशी वाद, भांडणे होणे संभवते. पण तो काही मंडळींना अर्थलाभही देऊ शकेल. या राशीच्या व्यय स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे काही मंडळींना अर्थलाभ होईल, काहींना परदेशगमनाची संधी मिळेल ,

पण त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने या राशीच्या ज्या मंडळींचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी " ओम सोम सोमाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी "ओम शंकराय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसु आहे त्यांनी " ओम अदितीये नमः: " तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि व बुध असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी सिंह राशीत जात आहेत. ही दोन्ही स्थाने या ग्रहांना अनुकुल नसल्याने संपूर्ण महिन्याच्या काळात हे दोन्ही ग्रह मनस्तापदायक होण्याचीच शक्यता आहे.

रविमुळे मनस्ताप, अनारोग्य, आर्थिक चिंता, भांडणे होण्याची शक्यता दिसते. विशेष करून डोळ्याचे अनारोग्य त्रस्त करील. बुधामुळे काही मंडळींना कुसंगतीचा त्रास सहन करावा लागेल. त्यातून धननाश होणे, मित्रांशी शत्रुत्व येणे, मनस्थिती अस्थिर, चंचल होणे, दुःखद घटना घडणे अशा प्रकारचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. पण महिन्याच्या उत्तरार्धात या बुधामुळे अर्थलाभ होण्याची शक्यताही आहे. या राशीच्या धनस्थानी प्रथमपासून मंगळ व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. येथील मंगळ अनारोग्यकारक होईल व त्याच्यामुळे उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. त्याशिवाय आर्थिक समस्याही अस्वस्थ करतील. पण येथील शुक्र अनुकुल होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, धनलाभ होणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात हा शुक्र या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर या राशीच्या काही मंडळींना धनलाभ किंवा भूमिलाभ

होईल, तर काहींना समाजात मान, प्रतिष्ठा लाभेल. या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होणे संभवते. तसेच काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या सप्तम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे या राशीच्या विवाहेच्छू मंडळींना विवाहयोग येणे संभवत नाही. शिवाय त्याच्यामुळे या राशीच्या विवाहितांच्या वैवाहिक सुखात बाधा निर्माण होण्याचीच शक्यता आहे. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरु ग्रहामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होईल. पण येथील नेपच्यून जलभयकारक व विषभयकारक असल्याने जलप्रवास करू नका, खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच बाहेरचे उघड्यावरचे खाद्यपदार्थ खाऊ नका. या राशीच्या दशम या व्यवसाय स्थानी मेष राशीत हर्षल असून तो उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींच्या मनात गैरमार्ग धन मिळविण्याचा मोह निर्माण होईल. पण त्यांनी या मोहाला बळी पडू नये. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. काही मंडळींना संततिविषयक एखादी चिंता त्रस्त करील.. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची व श्रीहनुमानाची उपासना मनःशक्ती व मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसु आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी "ओम बृहस्पतये नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी "ओम सर्पाय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या व्ययस्थानी कर्क राशीत रवि आणि बुध असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत येत आहेत. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात हे दोनही ग्रह प्रतिकुल होणार असून त्यांच्यामुळे शरीरपीडा, मानभंग, मनस्ताप, आर्थिक चिंता, थकवा, अनारोग्य, अपयश, अशा घटना घडणे संभवते. या लग्नस्थानी प्रथमपासून

मंगळ व शुक्र हे दोन ग्रह आहेतच. येथील मंगळसुद्धा प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे स्वभाव हट्टी अहंकारी, मानापमान फार असणारा असा घडल्यास नोकरीत प्रतिकुल परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. तसेच अकारण शरीरपीडा व दगदग होईल. अशा प्रतिकुल परिस्थितीत येथील शुक्रामुळे काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. हा शुक्र ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी गेल्यावर कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल. धनलाभही होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे घरात कोणाशी पटणार नाही, शिवाय तो विषभयकारक असल्याने बाहेरचे उघड्यावरचे खाद्यपदार्थ खाणे टाळले पाहिजे. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल; पण त्याच्यामुळे गैरसमज,वाद, भांडणे होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे नवे स्नेहसंबंध जुळून येतील व आधीच्या स्नेहसंबंधात वाढ होईल. काही मंडळींना प्रवास योग तर काहींना विवाहयोग येईल. अर्थलाभ होणेही शक्य आहे. पण येथील नेपच्यूनमुळे वैवाहिक जीवनात संकटे, बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत हर्षल असून तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. तसेच त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशवारीचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत राहू असून तो या राशीच्या नोकरदार मंडळींना अनुकुल होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना नोकरीत अधिकारपद मिळेल; तर काहींचा सन्मान होणेही संभवते. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर कुलदैवताच्या स्तोत्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनीं “ओम पितराय नमः:” या तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी “ ओम भगाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” या तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या लाभस्थानी कर्क राशीत रवि व बुध असे दोन ग्रह असून ते महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी जात आहेत. त्यामुळे हे दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होतील व महिन्याच्या उत्तरार्धात पूर्णपणे प्रतिकुल होतील. त्यामुळे या राशीच्या मंडळींनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. रविमुळे

महिन्याच्या पूर्वार्धात अर्थलाभ, नोकरीत पगारवाढ, बढती, व्यवसायात प्रगती होणे संभवते. नियोजित कार्यात यश मिळेल. बुधामुळे धनलाभ होईल, मित्रलाभ होईल व सुखसमाधान लाभेल. पण हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे शरीरपीडा, मानभंग होणे, नोकरी-व्यवसायात प्रतिकुल परिस्थिती निर्माण होणे, हाती घेतलेल्या कामात अपयश येणे, त्यामुळे अनारोग्याचा त्रास होणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे अशा प्रकारच्या घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या व्ययस्थानी प्रथमपासून मंगळ व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. येथील मंगळसुद्धा प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे वाद, भांडणे, मानहानी होणे संभवते. त्यामुळे मनस्थिती चिंताग्रस्त व अस्वस्थ राहील. पण शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व सुखसमाधान लाभेल. हा शुक्र या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी गेल्यावर अधिक सुख लाभेल, वैवाहिक जीवनातील सुखात भर पडेल व दिलासा मिळेल. या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे अकारण मानसिक अस्वस्थता जाणवेल. या राशीच्या पंचम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे स्वभाव संशयी, स्वार्थी, अत्यंत व्यवहारी असा होणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांना चिकाटीने प्रयत्न करूनच शैक्षणिक प्रगती करावी लागेल. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींना उगीचच एखादी आजारभावना किंवा काल्पनिक चिंता त्रस्त करील. काही मंडळींना फसवणुकीचा त्रास होणे संभवते. पण गुरु ग्रहामुळे आरोग्य उत्तम राहील व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत हर्षल असून तो अपघातभयकारक आहे. त्यामुळे या राशीच्या मंडळींनी सतत सावधानतेने आचरण करणेच जरूरीचे होईल. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे कौटुंबिक व संततीसुखात बाधा येणे संभवते. पण या राहूमुळे प्रवासयोग येण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ओम सूर्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी ‘ओम त्वष्टे नमः:” या तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा** - या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत केतू असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो कौटुंबिक सुख व गृहसौख्यास प्रतिकुल असल्यामुळे शक्यतो घरात वाद, भांडणे, गैरसमज होणार नाहीत याची काळजी घ्या. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून

नेपच्यूनमुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल. पण या राशीच्या ज्या मंडळींना अध्यात्मात मनापासून रस आहे त्यांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच हा नेपच्यून गूढ संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. गुरु ग्रहामुळे सर्व सुख मिळेल. प्रेमसंबंध असणारांचे प्रेमसंबंध घट्ट होतील. अर्थलाभ होईल व या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत हर्षल असून त्याचा गुरु ग्रहाशी लाभयोग होत असल्याने तो उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. गुरु-हर्षल शुभ योग अंतर्ज्ञान शक्तिदायक असल्याने या राशीच्या काही मंडळींना अशी अंतर्ज्ञान शक्ती प्राप्त होणे संभवते. तसेच तो कलोपासक असल्यामुळे या राशीच्या कलावंत मंडळींना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत राहू असून तो दीर्घायुष्यदायक आहे. पण त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. तसेच या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होईल. तसेच काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होऊ शकेल. या राशीच्या दशम या व्यवसाय स्थानी कर्क राशीत रवि व बुध असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह या राशीच्या लाभस्थानी सिंह राशीत जात आहेत. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात हे दोन्ही ग्रह अनुकुल होतील व त्यांच्यामुळे नोकरी-व्यवसायात अनुकुल व लाभदायक घटना घडतील. काही भाग्यवान मंडळींना मानसन्मान प्राप्त होणेही संभवते. बुधामुळे मानसिक. कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. मित्रसुख मिळेल. पण या राशीच्या लाभस्थानी प्रथमपासून मंगळ व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. मंगळामुळे कष्ट , प्रयत्न करूनच अर्थलाभ होईल. पण काही मंडळींना एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होणेही संभवते. पण या महिन्याच्या काळात शुक्र ग्रह लाभ व व्यय स्थानी असला तरी

अनुकुलच होईल व त्याच्यामुळे सर्व सुख, धनलाभ, ऐषाराम, मनःशांती मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी :" ओम वायवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी " ओम इंद्राग्नये नमः:" या तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतू असून तो सर्व प्रकारे अनुकुल होईल; पण त्याच्यामुळे वाहनधोका असल्यामुळे रस्त्याने जाताना सतत सावधानतेने आचरण करा. तसेच वाहन नियंत्रित वेगात व सावधानतेने चालवा. या राशीच्या तृतीय स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना नवीन नोकरी मिळेल; तर काही मंडळींना आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण या शनीमुळे एखादी भावंडविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील नेपच्यूनमुळे संशय, गैरसमज, घोटाळे अशापैकी कारणांनी घरगुती संबंधात बाधा येणे संभवते. येथील गुरु ग्रहामुळे काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पूर्ण होतील, कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल. पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत हर्षल असून तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल, पण त्याच्यामुळे मनस्थिती चंचल, अस्वस्थ होणे संभवते. काही मंडळींना मुदतीचा ताप येण्याची शक्यता आहे. या राशीच्या उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांनी सतत खोल विचार करत बसू नये. मेंदूला आवश्यक तेवढी विश्रांती मिळू द्या. नपेक्षा डोकेदुखी किंवा मेंदूविकार होऊ शकेल. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी राहू असून त्याच्यामुळे मनात कपटी विचार येतील. तसेच तो वैवाहिक जीवनात बाधा करील. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी कर्क राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात ते या राशीच्या दशम या व्यवसाय स्थानी जात आहेत. पण हे दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होणार असून त्यांच्यामुळे भय, निराशा, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे,

दिरंगाई निर्माण होणे, मानसिक ताण असह्य होणे, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागणे, त्यामुळे अनारोग्य होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. पण महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर अनुकुल होतील व सर्व प्रकारे अनुकुल, सुखकारक व लाभदायक होतील. या राशीच्या दशम स्थानी सिंह राशीत प्रथमपासून मंगळ व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. पैकी मंगळामुळे नोकरी-व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता आहे. नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल. तसेच काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण सहनशील बनून आचरण केल्यास मनस्ताप खूपच सुसह्य होईल. शुक्र ग्रहही महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकूलच होईल. त्याच्यामुळे नोकरी-व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर अनुकुल होईल व त्याच्यामुळे मानसिक सुखसमाधान व मनःशांती लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी " ओम इंद्राग्नये नमः " या तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम मित्राय नमः" या तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी " ओम इंद्राय नमः" या तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या व्ययस्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे स्वभाव लहरी, विक्षिप्त असा होणे संभवते. या राशीच्या धनस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता आहे. तसेच आर्थिक संकटे त्रस्त करतील. जपा. काही मंडळींना कोर्ट प्रकरणास सामोरे जावे लागेल. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून त्याच्यामुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल. पण या राशीच्या ज्या मंडळींना अध्यात्मात रस आहे अशांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच गूढ संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना तो अनुकुल होईल व हाती घेतलेल्या कार्यात प्रगती करणे शक्य होईल. त्याचप्रमाणे या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाचे तर काही

मंडळींना परदेशगमनाचे योग येतील. गुरु ग्रह या राशीच्या लेखकवर्गाला अनुकुल होईल व काही लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रसिद्ध होईल. तसेच प्रवासाचे योग येतील. पण एखाद्या भावंडापासून मनस्ताप दिला जाणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत हर्षल असून तो उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. गुरु ग्रहाशी शुभ योग असल्यामुळे काही मंडळींना अंतर्ज्ञान शक्ती प्राप्त होईल व तो कलाक्षेत्रातील मंडळींना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे स्वभाव धूर्त व कावेबाज होणे संभवते. पण ज्यांचे इतर जातिधर्माच्या मंडळींशी व्यावसायिक संबंध आहेत अशांना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होतील. पण काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या अष्टम स्थानी कर्क राशीत रवि व बुध असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह या राशीच्या भाग्यस्थानी जात आहेत. रवि ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे इच्छाअपेक्षा अपूर्ण राहतील. व दुःख, अपयश, संततिसुखात बाधा येणे अशा घटना घडतील, अनारोग्य होईल. मानसिक ताण वाढेल, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागेल. बुध ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल, व त्याच्यामुळे कार्यसिद्धी होईल, यश लाभेल व सुख लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे भांडणे होणे, नियोजित कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होणे व दिरंगाई होईल. या राशीच्या भाग्यस्थानी सिंह राशीत प्रथमपासून मंगळ व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. येथील मंगळ ग्रहामुळे प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. सबब शक्यतो प्रवास करू नका. शुक्र ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व या राशीच्या काही मंडळींना गुरुकृपा तर काहींना थोरकृपा प्राप्त होईल. सुख, ऐषाराम लाभेल. क्वचित कोणास कीर्ति , प्रसिद्धी प्राप्त होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या दशम स्थानी कन्या राशीत गेल्यावर प्रतिकूल होईल व नियोजित कार्यात अडचणी,अडथळे निर्माण होतील. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर “ बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी “ ओम निऋतये नमः:” या तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी “ ओम उदकाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीचा स्वामी शनि ग्रह असून त्याच्यामुळे स्वतः:चे किंवा जीवनसाथीचे अनारोग्याची समस्या त्रस्त करील. नियोजित कार्यात अडचणी, अडथळे

निर्माण होतील. त्याशिवाय कुटुंबातील कोणा प्रिय व्यक्तीचे स्थलांतर झाल्यास होणाऱ्या दूरत्वामुळे नैराश्य येईल. पण काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरु ग्रहामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील, व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होईल, अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. पण येथील नेपच्यूनमुळे आर्थिक संकटे येतील, आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्याची चिंता त्रस्त करील, जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे घरीदारी कोणाशी पटणार नाही, आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही, गृहसौख्य मिळणार नाही, व सतत तक्रारी करत राहाल. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. तसेच या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण ज्यांचा कमिशन, दलालीवर व्यापार-व्यवसाय आहे अशांना हा राहू अनुकुल व लाभदायक होईल. हा राशीच्या सप्तम स्थानी कर्क राशीत रवि व बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी सिंह राशीत जात आहेत. त्यामुळे रवि ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे दुःख, अनारोग्य, अपयश, संतिसुखात बाधा येणे संभवते. बुध ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे भांडणे होतील, दुःखदायक घटना घडणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या अष्टम स्थानी सिंह राशीत गेल्यावर अनुकुल होईल व त्याच्यामुळे कार्यसिद्धी होईल, यश मिळेल व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या अष्टम स्थानी सिंह राशीत प्रथमपासून मंगळ व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. पैकी मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल होणार असून तो अनारोग्यकारक होईल व त्याच्यामुळे मूळव्याधीसारखे उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. तसेच हाडमोड होणेही संभवते. त्याशिवाय वीज, पाणी यांपासून धोका असल्याने विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा. तसेच जलप्रवास करू नका, खोल पाण्यात पोहू नका. पण येथील शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी कन्या राशीत जाणार असला तरी तो महिन्याच्या संपूर्ण

काळात अनुकुल व लाभदायक होईल. त्याच्यामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होईल. पण इतर सर्वांनाच कमी श्रमात भरपूर अर्थलाभ होईल. महिन्याच्या उत्तरार्धात या शुक्रामुळे काही मंडळींना गुरुकृपा तर काहींना थोरकृपा प्राप्त होईल. काहींना कीर्ती, प्रसिद्धी प्राप्त होईल. या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत केतू असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे सुखसमाधान लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी " ओम विष्णवे नमः: " तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी " ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील नेपच्यूनमुळे मनस्थिती अत्यंत कोमल व भावनाशील होईल व मानसिक संवेदना अति जलद होतील. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच मन उदास होईल व गहिरे नैराश्य येईल. येथील गुरु ग्रह शुभ असून त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील व तो बौद्धिक संशोधन कार्यक्षेत्र असणारांनां व या राशीच्या लेखकांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे उच्च बौद्धिक शक्ती, स्मरणशक्ती व आकलन शक्ती प्राप्त होईल. उच्च बौद्धिक संशोधन कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. त्याच्यामुळे काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत राहू असून तो कौटुंबिक सुखास प्रतिकुल होईल, व त्याच्यामुळे कुटुंबात गैरसमज, वाद, भांडणे होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कौटुंबिक सुखात बाधा येईल. या राशीच्या षष्ठ स्थानी कर्क राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होतील. रवि ग्रह दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल; त्याच्यामुळे हितशत्रू पराभूत होतील, पण तो अनारोग्यकारही होईल.

काही मंडळींना हृदयविकाराचा आजार त्रस्त करील. बुध ग्रहही महिन्याच्या पूर्वार्धात अनुकूल होईल व त्याच्यामुळे कार्यसिद्धी होऊन अर्थलाभही होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि -बुध या राशीच्या सप्तम स्थानी सिंह राशीत गेल्यावर प्रतिकुल होतील. येथील रवि केंद्रस्थानी असून भाग्योदयकारक असला तरी तो अनारोग्यकारकच होईल. तसेच बुधामुळे दुःख, वाद, भांडणे होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी सिंह राशीत प्रथमपासून मंगळ व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. येथील मंगळ जीवनसाथीचे अनारोग्य, वैवाहिक जीवनातील कटकटी, वाद अशापैकी कारणांनी मनस्तापदायकच होईल. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी गैरसमज, संशय, मतभेद अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. येथील शुक्रामुळे वैवाहिक जीवनात सुखसमाधान लाभेल. प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. येथील शुक्र या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसाहक्काने असा धनलाभ होईल. या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून मनात नोकरीशिवाय दुसरे काही करण्याचा विचार प्रबळ होईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवावा व आहे ती नोकरीच मनापासून करावी. या राशीच्या व्यय स्थानी मकर या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे संकटपरंपरा निर्माण होण्याची शक्यता आहि. सबब या काळात सर्व आर्थिक व्यवहार जपून, सावधानतेने, विचारपूर्वकच करावेत. त्याशिवाय अनारोग्य, मानहानी होणेही संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने " श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्री हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी "ओम वरुणाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या धनस्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे मनस्थिती व विचारशक्ती अति अस्थिर होईल. त्यामुळे अविचाराने खर्च होणे संभवते. त्याशिवाय वाचेवर

नियंत्रण राहणार नाही व त्यामुळे आपल्या अविचारी फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे याचे भानही राहणार नाही. जपा. या राशीच्या तृतीय सथानी वृषभ राशीत राहू असून तो अनुकुल होईल व हातून कर्तबगारी घडेल. पण या राहूमुळे बंधुसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या पंचम स्थानी कर्क राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होतील व महिन्याच्या उत्तरार्धात ते या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर काही प्रमाणात अनुकुल होतील. महिन्याच्या पूर्वार्धात रविमुळे अनारोग्य, अपघात, संततीविषयक समस्या त्रस्त करील. नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. नातेवाईक मंडळींपासून फारकत होणे संभवते. त्यामुळे मनस्थिती अस्वस्थ होईल. बुधामुळे संतती-स्त्रीपासून त्रास सहन करावा लागेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर अनुकुल होतील. रवि ग्रह दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल, हितशत्रू पराभूत होतील. बुधामुळे हाती घेतलेल्या कार्यात यश मिळेल. अर्थलाभ होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी सिंह राशीत मंगळ व शुक्र हे दोन ग्रह प्रथमपासून आहेतच. येथील मंगळ आरोग्यविघातक असून त्याच्यामुळे ताप येणे, अंगावर फोड येणे,

रक्तविकार बळावणे, चोरी होणे, अपप्रचाराचा त्रास होणे, आर्थिक नुकसान होणे संभवते. शुक्रामुळे

प्रगतीची किंवा अर्थलाभाची अपेक्षा न करता केवळ कलेसाठी कला हा विचार मनाला पक्का रुजवून कलेची साधना करावी लागेल. येथील शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल, प्रेमिकांचे प्रेमविवाह संपन्न होतील. या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत केतु असून त्याच्यामुळे हातून ढोंगी आचरण घडेल, व संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो अनुकुल व लाभदायक होईल; पण संततिविषयक समस्या त्रस्त करील. या राशीच्या व्यय स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे ज्यांना अध्यात्मात व सामाजिक कार्यात रस आहे त्यांना प्रगतीसाठी काळ अनुकुल होईल. पण गुरूमुळे कौटुंबिक त्रास व संततीविषक समस्या त्रस्त करील. नेपच्यूनमुळे

मानसिक व्यग्रता व नैराश्य येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना सुखशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे

**पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी " अजैकचरणाय नमः:" या तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी ओम अहिर्बुध्न्याय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी "ओम पूषाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.**

==========ooooo0ooooo==========